KOLHAPUR ENGINEERING ASSOCIATION

# एकत्रित आहात या संघटीत रहा , कोल्हापूरचे मार्केटिंग मोठया प्रमाणावर करा

औद्योगिक समस्या सोडविण्यासाठी ठाम रहा-सुधीर मुतालिक

कोल्हापूरची गरज निर्माण करा, येथील उद्योग बाहेर जावू देवू नका, पुढील दहा वर्षात कोल्हापूरच्या उद्योग प्रगतीचे स्वप्न पुर्ण करण्यासाठी ठाम रहा. एका छता खालीलच काम केलेतर प्रश्न मार्गी लागण्यास मदत होईल. कोल्हापूरने ठरवावे की पुढील 10 वर्षात 25000 लघु उद्योग कसे निर्माण होतील, लहान उद्योग मध्यम उद्योग कसे होतील आणि मध्यम उद्योग कसे मोठया उद्योगात रूपांतरीत होतील हे काम संघटने मार्फत होवू शकते.

शासनाने उद्योग वाढीसाठी नक्कीच मदत केली पाहिजे यात शंका नाही. कांही शासकीय उपक्रम (उदा. शासकीय गोदामे, रेल्वे इ. ) हे खासगी क्षेत्राकडे दिल्यास नक्कीत त्याचा उपयोग चांगल्या प्रकारे शासनाला आणि पर्यायाने जनतेलाही होवू शकतो याचा शासनाने नक्कीच विचार करावा असे प्रतिपादन सीआयआय,या संस्थेचे महाराष्ट्र स्टेट कौन्सीलचे चेअरमन श्री.सुधीर मुतालिक यांनी केले. कोल्हापूर इंजिनिअरिंग असोसिएशनने आयोजित केलेल्या ‘‘ औद्योगिक समस्या आणि उपाय’ ’ या चर्चासत्रात ते बोलत होते.

किमान वेतनवाढ , मोठे उद्योग न येणे, वीजदरवाढ, कोल्हापूरला कॉरिडॉर मधून वगळले, टॅक्सेसमध्ये सुलभता निर्माण होणे, निर्यात विषयावर चर्चा होवून मार्ग काढणे यासाठी नक्कीच एक पॅटर्न ठरवून काम सर्वांनी करू आणि हे प्रश्न शासन दरबारी मांडून याचा पाठपुरावा करू असे श्री.मुतालिक म्हणाले. सर्वच प्रश्न शासन मार्गी लावू शकणार नाही. उद्योजकांच्या समस्या कोण सोडविणार ? असोसिएशन सोडविणार ? सीआयआय सोडविणार कि शासन सोडविणार? असा प्रश्न येथील उद्योजकांनी व्यक्त केला. सदरचे प्रश्न मार्गी लागत नसलेबाबत खंतही व्यक्त केली.

गेल्या वर्षी अचानक लागू केलेल्या लॉकडाउनमुळे अनेक समस्या निर्माण झाल्या होत्या. उद्योग सुरू करण्यासाठी पॉलिसी देणे, लसीकरण, कोरोना आरटीपीसीआर सारख्या तपासणी करण्याची समस्या इ.बाबत शासनासी सातत्याने चर्चा केली.

सीआयआय ही खूप मोठी संस्था असून उद्योगा बरोबरच सामाजिक क्षेत्रातही एक सामाजिक जबाबदारी म्हणून काम करित आहे. कोल्हापूर प्रशासनास सहा व्हेंटिलेटर्स, दिले आहेत. तसेच देश पातळीवर व्हेंटिलेटर्स, पाच ऑक्सीजन प्लॅण्ट निर्मितीसाठी सहकार्य केले आहे. पाच लाख पीपीई किटचे वाटप केले आहे. सीआयआय ही संस्था जागतीक दर्जाचे विविध उपक्रम भारतातील विविध भागात राबविण्यासाठी कार्य करित आहे आणि यासाठी शासनासी सातत्याने संपर्कात आहे. भारतातील अनेक उत्पादने निर्यात क्षम असून उत्तम दर्जाचे आहेत. ती निर्यात करून निर्याती सारख्या संधीचा येथील उद्योजकांनी फायदा करून घ्यावा असेही प्रतिपादन श्री. मुतालिक यांनी केले.

या चर्चासत्रात दिनेश बुधले, सोहन शिरगावकर, रवि डोली, प्रभाकर घाटगे इ.नी प्रश्न उपस्थित केले

इंजिनिअरिंग असोसिएशनच्या गेल्या 74 वर्षातील औद्योगिक प्रगतीचे फोटो प्रदर्शन खूप प्रेरणादायक असल्याचा उल्लेख केला.  येथील उद्योजकांनी त्यांचे श्रम, आयुष्य, आर्थिक ताकद खर्ची घातली आहे त्यामुळे कोल्हापूरचे उद्योग हे ऐतीहासीक वारसा असलेले शहर आसल्याचा गौरव उद्‌गारही श्री.मुतालिक यांनी काढले.  तसेच हा वारसा जपावा, वाढवावा अशी इच्छा व्यक्त करून अमृत महोत्सवाबद्दल सर्वांना शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाचे प्रस्ताविकांमध्ये शिवाजी उद्यमनगरच्या यशस्वी प्रवासाबाबतची माहिती  अध्यक्ष श्री.सचिन मेनन यांनी दिली.  प्रमुख पाहुण्याची ओळख उपाध्यक्ष श्री.हर्षद दलाल यांनी करून दिली. श्री मुतालीकसाहेब यांचा शाल, श्रीफळ, स्मृतिचिन्ह देऊन श्री सचिन मेनन यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. आभार प्रदर्शन श्री.दिनेश बुधले यांनी केले. सूत्र संचालन प्रदीप व्हरांबळे यांनी केले.  या चर्चासत्रात सर्व श्री सचिन मेनन,हर्षद दलाल, दिनेश बुधले,प्रसन्न तेरदाळकर,कमलाकांत कुलकर्णी,श्रीकांत दुधाणे, रणजीत शाह,संजय अंगडी,नितिन वाडीकर, बाबासो कोंडेकर, अतुल आरवाडे, अमर करांडे, अभिषेक सावेकर,सोहन शिरगावकर, सचिन शिरगावकर,पल्लवी कोरगावकर, रवि डोली,शाम देशिंगकर, मोहन पंडितराव,प्रभाकर घाटगे,सागर जाधव,सुर्यकांत खोत,प्रशांत मोरे,मिलींद सार्दळ इ.उपस्थित होते.